राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed through State Government) खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनीलोन सहकारी साखर कारखान्यांना उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र.ससाका-२०१९/प्र.क्र.८०/३-स
मंत्रालय, सहावा मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दि. ११ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :- .१ साखर आयुक्त यांचा प्रस्ताव दि. २५.४.२०१९, दि. १४.६.२०१९, दि. २६.६.२०१९, दि.२७.६.२०१९, दि. २८.६.२०१९ व दि. १६.७.२०१९

२. मा. मंत्रीमंडळाच्या दि. २८.०८.२०१९ आणि दि. ९.९.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचा शासन निर्णय क्र.ससाका-२०१९/प्र.क्र.८०/३-स, दि. ५.९.२०१९

प्रस्तावना :-

राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed through State Government) खेळत्या भाग भांडवलासाठी मार्जिन मनी लोन योजनेतंर्गत, सहकार शिरोमनी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना लि., चंद्रभागा नगर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर, श्री.तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि, वारणानगर ता. पन्हाळा जि. कोल्हापूर , भिमा सहकारी साखर कारखाना लि. टाकळी सिकंदर, ता.मोहोळ, जि.सोलापूर व वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या. पांगरी, ता.परळी, जि.बीड या चार सहकारी साखर कारखान्यांनी अनुक्रमे रु.७५ कोटी, रु.१०० कोटी, रु.८५ कोटी, रु.५० कोटीचे असे एकूण रक्कम रु. ३१०.०० कोटी (यापैकी खेळत्या भाग भांडवलाची अनुक्रमे रक्कम रु.२८ कोटी, रु.४८.६० कोटी, रु. ४८.९६ कोटी व रु. १० कोटी असे एकूण रक्कम रु. १३५.५६ कोटी) मिळणेची विनंती केली होती.

साखर कारखांन्याकडून प्राप्त अर्थसहाय्याच्या प्रस्तावाची आर्थिक व तांत्रिक छाननी करण्यासाठी समिती गठीत करणे, या समितीच्या छाननीच्या अनुषंगाने प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या निर्णयार्थ सादर करण्याची शिफारस करण्यास्तव मा. मंत्री समिती गठीत करणे तसेच उपरोक्त चार साखर कारखान्यांची राज्य शासनामार्फत खेळत्या भाग भांडवलासाठी राष्ट्रीय सहकारी विकास निगम (NCDC) कडून अर्थसहाय्य (Routed through state government) उपलब्ध करून देण्याची मागणी उपरोक्त नमूद गठीत करावयाच्या मंत्री समिती पुढे सादर करण्यात यावी अथवा वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार (१) ज्या कारखान्याचे नक्त मूल्य अधिक आहे. (२) ज्या कारखान्याचे संचित तोटे नाही. (३) ज्या कारखान्यांना यापूर्वी राज्य शासनाकडून देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची येणेबाकी/ थकबाकी निरंक आहे. (४) ज्या कारखान्यांना यापूर्वी देण्यात आलेल्या शासन थकहमी आवाहनित झालेली नाही. (५) ज्या कारखान्याकडे इतर बँका आणि वित्तीय संस्था यांचेकडून घेण्यात आलेले इतर कर्ज खाते NPA मध्ये नाही, या नमूद आर्थिक निकषांची पुर्तता करणाऱ्या कारखान्यांना खेळते भागभांडवल उपलब्ध करून द्यावे किंवा कसे

याबाबतच्या प्रस्तावावर मंत्रीमंडळाच्या दि. २८.०८.२०१९ रोजीच्या बैठकीतील इतिवृत्तातील अ.क्र.१ येथील निर्णयानुसार संदर्भ क्र.३ अन्वये तांत्रिक-आर्थिक समिती तसेच मा.मंत्री समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच मा.मंत्रीमंडळाच्या दि. २८.८.२०१९ बैठकीच्या इतिवृत्तातील अ.क्र.२ व ३ निर्णयानुसार आणि दि. ९.९.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार कारखान्यांना अर्थसहाय्य देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

१. (१) ज्या कारखान्याचे नक्त मूल्य अधिक आहे. (२) ज्या कारखान्याचे संचित तोटे नाही. (३) ज्या कारखान्यांना यापूर्वी राज्य शासनाकडून देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची येणेबाकी/ थकबाकी निरंक आहे. (४) ज्या कारखान्यांना यापूर्वी देण्यात आलेल्या शासन थकहमी आवाहनित झालेली नाही. (५) ज्या कारखान्याकडे इतर बँका आणि वित्तीय संस्था यांचेकडून घेण्यात आलेले इतर कर्ज खाते NPA मध्ये नाही, या पाच आर्थिक निकषांच्या आधारे (दि. ३१.३.२०१८ च्या स्थितीस अनुसरुन) उपरोक्त चार कारखान्यांची साखर आयुक्तांनी छाननी करुन पात्र ठरणाऱ्या कारखान्यास खेळते भाग भांडवल उपलब्ध करुन देण्याबाबत राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) कडे राज्य शासनामार्फत शिफारस करण्यात येईल. सदर मान्यता पुढील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१. सदर कर्जाची वसुली कारखान्यांकडून Escrow account ओपन करावयाचे असल्याने कारखाना व साखर आयुक्त, पुणे यांनी एक स्वतंत्र संयुक्त Escrow account प्रथम सुरु करावे. सदर खाते साखर आयुक्त आणि कारखान्यांचे अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीनेच हाताळले जाईल.
२. याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (MSEDCL), कारखाना व साखर आयुक्त यांनी त्रिपक्षीय (Tripartite) करार करावा.
३. सदर कर्जाच्या वसुलीसाठी कारखान्याने उत्पादित केलेल्या सहनिर्मित विजेची विक्री करुन वीज विक्रीपोटी उपलब्ध होणाऱ्या रक्कमेतून कर्जाची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने (MSEDCL) Escrow account मध्ये जमा करावी. सदर रक्कम NCDC च्या परतफेड वेळापत्रकातील देय हप्त्यापुर्वी जमा होईल याबाबत साखर आयुक्तांनी MSEDCL व ऊर्जा विभागाशी समन्वय ठेवावा. तसेच जर कोजनरेशन प्रकल्प कारखान्याकडे नसल्यास अथवा कोजनरेशनचे उत्पादन कमी किंवा झालेच नाही अशावेळी कारखान्याकडून इतर उत्पादनातून (इथेनॉल, डिस्टीलरी) सदर रक्कम Escrow account मध्ये जमा केली जाईल, याची दक्षता साखर आयुक्त यांनी घ्यावी. या खात्यातून जमा झालेल्या रकमेतून प्रथमत: शासनाची सदर देय रकमेचा हप्ता वसूल करण्यात येईल, तद्नंतर उर्वरित रकमेचा कारखान्यास विनियोग करता येईल.
४. सदर Escrow account मधून राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) ला त्याच्या परतफेड वेळापत्रकानूसार देय कर्जाची रक्कम अदा केली जाईल, याबाबत साखर आयुक्त यांनी दक्षता घ्यावी.
५. साखर विक्रीतून प्राप्त होणाऱ्या रकमेतून प्रति क्विंटल रु.२५०/- टॅगींग करुन सदर रक्कम Escrow account मध्ये जमा करणेबाबत बँकेस साखर आयुक्त आणि सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांच्यामार्फत कळविण्यात यावे. सदर Escrow account साखर आयुक्त व कारखाना संयुक्त रित्या हाताळतील. कर्जाच्या हप्त्याची कारखान्यांकडून जोपर्यंत परतफेड होत नाही, तोपर्यंत साखर विक्रीतून प्राप्त होणारी रक्कम साखर आयुक्त यांच्या परवानगी शिवाय काढता येणार नाही.
६. सदर अर्थसहाय्य देण्यापुर्वी संबंधित कारखान्यांच्या संचालकांची सामुहिक व वैयक्तीक मालमत्ता तारण म्हणून घेण्यात यावी. यासाठी साखर आयुक्त, पूणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

७. Escrow account ओपन केल्यानंतर, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (MSEDCL), कारखाना व साखर आयुक्त यांनी त्रिपक्षीय (Tripartite) करार केल्यानंतर तसेच कारखान्यांच्या संचालकांची सामुहिक व वैयक्तीक मालमत्ता तारण म्हणून घेण्यात आल्यानंतरच महाराष्ट्र शासनामार्फत राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) कडे शिफारस करण्यात येईल.

८. राष्ट्रीय सहकार विकास निगम, नवी दिल्ली यांच्याकडून आकारण्यात येणाऱ्या व्याज दराने कर्जाची वसूली साखर आयुक्त, पुणे यांनी नियमित व खात्रीशीर करावी.

२. राज्य शासनाने सर्व सहकारी साखर कारखान्यांना यापूर्वी दिलेले शासकीय भागभांडवल, शासकीय कर्ज, शासकीय हमीशुल्क या सर्वांची वसुली सहवीज निर्मिती व इतर प्रकल्पातुन प्राप्त होणाऱ्या रक्कमेतुन Escrow account ओपन करून साखर आयुक्तामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वसुलीबाबतच्या प्रगतीचा अहवाल साखर आयुक्त, पुणे यांनी प्रत्येकी ३ महिन्याने राज्य शासनास सादर करावा.

३. खेळत्या भागभांडवलामध्ये कोणत्या मुद्यांचा समावेश होतो, याबाबत राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्या अभिप्रायानुसार सुधारणा करण्याचे अधिकार मा. मुख्य सचिव यांना प्रदान करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दि. २८.०८.२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौ. सं.क्र. ४०१/ २०१९/ व्यय-२, दि. ११.०९.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. **२०१९०९१११८१७०७०३०२** असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरी करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d09609003b414273f73, serialNumber=8ff188a569f4a95d2f0ce8ca61e60d8aa5f51a1bf65b42dd49bb26d165941d9e, cn=Sudin Gaikwad
Date: 2019.09.11 20:21:14 +05'30'

(डॉ.सुदिन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा.राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व विधान परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई
६. सर्व विधान सभा सदस्य, विधान मंडळ, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (मुळ स्वाक्षरीच्या १० प्रतींसह)

११. प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे
१२. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१३. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर.
१४. निवड नस्ती (३-स)